RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ९, अंक ३] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १९-२५, २०२३/पौष २९-माघ ५, शके १९४४ [पृष्ठे १३, किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण सूचना व जाहिराती

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

**IN INSOLVENCY**

The Debtors hereunder mentioned have been adjudged Insolvents in Insolvency Petition No. 2 of 2020 as on 19th August, 2022 by the Hon'ble Insolvency Court.

**INSOLVENCY PETITION No. 2 OF 2020**

Re.— 1. Mr. P. A. Anantharaman,
Residing at B/503-504 Mount Everest,
Bhakti Park, Wadala, Mumbai 400 037.

2. M/s. Anand Traders,
A Firm, carrying on business at
12-B, Shriram Industrial Estate,
13, G. D. Ambekar Road, Wadala (West),
Mumbai 400 031.

.................Debtors

The Petition was presented to this Hon'ble Court on 6th January, 2020 by

M/s. GANESH PAPER MART.

..........Petitioning Creditor

Dated this 6th day of January, 2023.

D. R. TALEKAR,
*I/c.* Insolvency Registrar,
High Court, Bombay.

**जिल्हा परिषद, अमरावती**

**वार्षिक प्रशासन अहवाल**

**सन २०२१-२२**

**अधिसूचना**

क्रमांक जिप/साप्रवि/नियोजन/६७३१/२०२२

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १४२ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करणे) सुधारणा नियम, १९६४ मधील नियम ९ व (सुधारणा) नियम, १९८१ अन्वये मी, अविश्यांत पंडा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती या अधिसूचनेद्वारे जाहीर करतो की, क्र./जिप/साप्रवि/नियोजन/६७२८/२०२२, दिनांक ३० डिसेंबर २०२२ नुसार वार्षिक प्रशासन अहवाल सन २०२१-२२ ला अंतिम मंजुरी प्रदान केल्यानंतर सदरहू तारखेस प्रसिद्ध करीत आहे.

अमरावती,
दिनांक ३० डिसेंबर २०२२.

**अविश्यांत पंडा** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

## जिल्हा परिषद, परभणी

जाक्र./जिपप/वित्त/संकलन-१/कावि/३०५१/२०२२

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६८ चे कलम १३६ (९) अन्वये**

वार्षिक लेखे २०२१-२२

| अ.क्र. (१) | निधिचा तपशील (२) | वार्षिक लेखे सन २०२१-२२ (३) |
|---|---|---|
| १ | सुरुवातीची शिल्लक | २२५४८०७२४७ |
| २ | सन २०२१-२२ मधील जमा | १०४६८३७४०९७ |
| ३ | एकूण जमा | १२७२३१८१३४४ |
| ४ | सन २०२१-२२ मधील खर्च | १०३१९३९००९१ |
| ५ | अखेरची शिल्लक दिनांक ३१ मार्च २०२२ | २४०३७९१२५३ |

**सचिन कवठे,**
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

**रश्मी खांडेकर,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सूचना**

क्रमांक प्र.अ. (वि.नि.) /शहर / २५४६२, दिनांक १२ जानेवारी २०२३.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नियोजन प्राधिकरण किंवा राज्य सरकारने असे निर्देश दिल्यावर, अशा निर्देशांच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, कोणत्याही व्यक्तीकडून सूचना / आक्षेप मागवण्याकरिता नोटीस प्रकाशित केली जाईल आणि सुनावणी दिल्यानंतर, प्रस्तावित बदल राज्य सरकारला सादर करण्यात येईल. सदर बदल मंजूर करणे किंवा मंजुरी देण्यास नकार देणे हे राज्य सरकारच्या अधिकारास अधीन राहील ;

ज्याअर्थी, महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. बीएमसी / एडीएमएन / ३, दिनांक ७ एप्रिल २०२२ नुसार अद्यावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६ क (१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित आहेत.

त्याअर्थी, प्रशासक (महानगरपालिका) यांचा ठराव क्र. ५०, दि. डिसेंबर २०२२ च्या आदेशान्वये 'ई' विभागातील डिव्हीजन माझगांव येथील भू. क्र. ५९० वरील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३१(१) नुसार मंजूर विकास आराखडा, २०३४ मध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरू करण्याबाबत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (२) नुसार फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजुरी घेण्याकरिता नगर विकास विभाग खात्याशी संपर्क साधण्याची मंजुरी दिली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असा उल्लेख करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टीपीबी ४३१७/६२९/प्र. क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दिनांक ८ मे २०१८ (यापुढे "उक्त अधिसूचना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना - २०३४ (यापुढे " उक्त विकास योजना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०३४ ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजुरी दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर शासनाने उक्त अधिसूचनेस समक्रमांकाचे शुद्धिपत्रक व पुरकपत्र दिनांक २९ जून २०१८ रोजी पारित केले असून सदर शुद्धिपत्रक व पुरकपत्र **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** दिनांक ३० जून २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिसूचनेस समक्रमांकाचे शुद्धिपत्रक दिनांक २२ जून २०१८ रोजी निर्गमित केले असून त्यानुसार उक्त विकास योजना दिनांक १ सप्टेंबर २०१८ पासून अंमलात आली आहे ;

शासन अधिसुचना दिनांक ८ मे २०१८ नुसार न.भू.क्र. ५९० हा सारभुत स्वरूपाचे प्रस्तावित फेरबदल ( EP - E42 ) मध्ये समाविष्ट करण्यात आला होता. तसेच सदर भूभागावर, सदर अधिसूचनेप्रमाणे उद्यान / बगीचा (EOS1.5) + प्राणीसंग्रहालय (EOS2.3) हे नामनिर्देशन दर्शविण्यात आले होते व सदर अधिसूचनेसोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या नकाशानुसार सदर भूभागावर उद्यान / बगीचा (ROS1.5) + प्राणीसंग्रहालय (ROS2.3) चे आरक्षण दर्शविण्यात आले होते.

तद्नंतर, सारभूत स्वरुपाचे फेरबदल क्र. EP-E42, शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टीपीबी- ४३२०/प्र. क्र.१३५/२०२० /नवि-११, दिनांक १२ सप्टेंबर २०२२ अन्वये मंजूर करण्यात आला होता. तसेच, सदर अधिसूचनेप्रमाणे फेरबदल क्र. EP-E42 मधून न.भू.क्र. ५९० वगळण्यात आला होता. यास्तव, सदर भूभागावर अधिसुचना दिनांक ८ मे २०१८ प्रमाणे नमूद केलेले नामनिर्देशन व सदर अधिसूचनेबरोबर प्रसिद्ध करण्यात आलेल्या विकास आराखड्याप्रमाणे दर्शविण्यात आलेले आरक्षण पुनास्थर्पित करण्यात आले आहे ;

ज्याअर्थी, अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र. टीपीबी- ४३२०/ प्र.क्र.१३५/२०२२/वियो फेर /नवि-११, दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ अन्वये न.भू.क्र. ५९०, माझगांव डिव्हीजन या भूभागाचे संपादन न केल्याचे व सदर भूभागावर वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालय हे अस्तित्वात नसल्यामुळे, बृहन्मुंबई विकास योजना २०३४ मध्ये सदर भूभागावर दर्शविण्यात

आलेले उद्यान / बगीचा ( EOS1.5 ) + प्राणीसंग्रहालय ( DOS2.3 ) चे नामनिर्देशन रद्द करून सदर भूखंड रहिवास वापरात समाविष्ट करण्याबाबत, विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ ( १ ) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करावा असे कळविले आहे. सदर भूभागाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| | | |
|---|---|---|
| १ | भूभाग क्र. व डिव्हीजन | ५९०, माझगांव डिव्हीजन |
| २ | क्षेत्रफळ | १३७३.७५ चौ.मी. |
| ३ | मंजूर पुनर्रचित विकास आराखडा १९९१ प्रमाणे दर्शविण्यात आलेले आरक्षणाचा तपशील | वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानाच्या विस्ताराकरिता |
| ४ | मंजूर आराखडा २०३४ प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या आरक्षण व नामनिर्देशनाचा तपशील : | |
| | अ. विकास आराखड्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे तपशील | उद्यान / बगीचा ( ROS1.5 ) + प्राणीसंग्रहालय ( ROS2.3 ) चे आरक्षण |
| | ब. शासन अधिसुचना दिनांक ८ मे २०१८ प्रमाणे तपशील | उद्यान / बगीचा ( EOS1.5 ) + प्राणीसंग्रहालय ( EOS2.3 ) चे नामनिर्देशन |
| ५ | प्रस्तावित बदल | अधिसूचनेप्रमाणे दर्शविण्यात आलेले उद्यान / बगीचा ( EOS1.5 ) + प्राणीसंग्रहालय ( EOS2.3 ) हे नामनिर्देशन रद्द करून व सदर अधिसुचनेसोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या नकाशानुसार सदर भूभागावर दर्शविण्यात आलेले उद्यान / बगीचा ( ROS1.5 ) + प्राणीसंग्रहालय ( ROS2.3 ) चे आरक्षण रद्द करून सदर भूखंड रहिवास वापरात समाविष्ट करण्याबाबत. |

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ ( १ ) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करून, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ ( १ ) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिद्ध करीत आहे. मनपाकडून असेही कळविण्यात येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती / सूचना सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात प्रमुख अभियंता ( विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१, या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ ( १ ) अन्वये कार्यवाही करण्यात येईल ;

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील ठिकाणी ठेवण्यात आला आहे :—

( १ ) प्रमुख अभियंता ( विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

( २ ) उपसंचालक, नगररचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

**परिशिष्ट**

*SCHEDULE*

| **Sr. No.** | **Details of land** | **Details of Reservation / Existing Amenity/ Zone affected the said land shown in Column No. 05 of Government Notification dtd. 08.05.2022.** | **Details of Reservation / Existing Amenity/Zone affected the said land as per Development Plan-2034 published u/s 31 (1) of MR & TP Act, 1966** | **Proposed Modification** |
|---|---|---|---|---|
| 1 | C. S. No. 590 of Mazagaon Division | Designation of Garden (EOS 1.5) + Zoo (EOS 2.3) and located in Residential Zone. | Reservation of Garden / Park (ROS 1.5) + Zoo (ROS 2.3) and located in Residential Zone. | Reservation / Designation is deleted and included in Residential Zone. |

**सुनिल हि. राठोड,**

प्रमुख अभियंता (विकास नियोजन).

# BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

*NOTIFICATION*

No. Che. (D.P.) / City/25462, Dated 12th January 2023.

Whereas, in exercise of the powers conferred by sub section (*1*) and (*2*) of section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “ MR & TP Act, 1966”), the Planning Authority may, or when so directed by the State Government shall within one month from date of such directions publish a notice inviting suggestions/ objections from any person, as mentioned therein and after giving hearing, submit the proposed modification to the State Government and the State Government subject to such condition as it may deem fit sanction the modification or refuse to accord sanction ;

And whereas, as per circular u/No. BMC/ADMN/3, dated 7th April 2022 under section 6C (1) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (hereinafter referred as “ MMC Act, 1888”) all the powers of the Corporation are now vested with the Administrator ;

And whereas, Administrator (Corporation) has accorded sanction to the proposal *vide* resolution No. 50, dated December, 2022, to take further action to modify the plot bearing CS No. 590 of Mazgaon Division in Sanctioned DP, 2034 to invite suggestions/ objections from general public u/s. 37(1) of MRTP Act, 1966 and approach State Govt. in Urban Development Dept. for final sanction u/s. 37(2) of MRTP Act, 1966 for modification in Sanctioned DP 2034 ;

And whereas, as per the powers conferred by sub section (*1*) of section 31 of the MR and TP Act, 1966, State Government has accorded sanction to the Draft Development Plan 2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as “ the said Development Plan”) *vide* Notification No. TPB-4317/629/ CR-118/2017/DP/UD-11, dated 8th May 2018 (hereinafter referred to as "the said Notification") along with the Development Control and Promotion Regulations, 2034 for Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification ;

And whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum dated 29th June 2018 to the said Notification, which is published in the *Government Gazette* dated 30th June 2018 ;

And whereas, Government has issued a corrigendum dated 22nd June 2018 to the said Notification, as per which, the said Development Plan has came into force from 1st September 2018;

And whereas, the plot bearing CS No. 590 of Mazgaon Division was included in Excluded part (EP-E42), the Designation of Garden (EOS 1.5) + Zoo (EOS 2.3) was shown on the said plot in the said Notification dated 8th May 2018 and reservation of Garden/ Park (ROS 1.5) + Zoo (ROS 2.3) was shown on the DP plan published along with the said Notification ;

Further, said modification EP-E42 is approved by the Urban Development Department, Government of Maharashtra *vide* No. TPB-4320/CR-1J5/2020/UD-11, dated 12th September 2022. The said plot is excluded from the EP-E42 as per the said notification. Hence, the Designation and Reservation shown in notification and DP plan respectively published in Government Notification dated 8th May 2018 is restored ;

And whereas, Under Secretary, Urban Development Department, Government of Maharashtra *vide* letter u/No. TPB-4320/135/CR 2022 / DP (Rev) UD-11 dated 16th November 2022 has directed

BMC to follow due process of modification under section 37(1) of MR and TP Act, 1966 for deleting the EOS 1.5+ DOS 2.3 and include the said plot in Residential Zone after following due process of law as the plot is not included in acquisition process by BMC. Further, there is no existing Garden/ Zoo (extension of Veermata Jijabai Bhosale Udyan hereinafter referred as VJB) is found on site. The details of the plots area is as under :—

| | | |
|---|---|---|
| 1 | Plot bearing CS No and Division | 590 of Mazgaon Division |
| 2 | Area of plot | 1373.75 Sq.m |
| 3 | Details of Reservation as per SRDP 1991 | Extension of VJB Udyan |
| 4 | Details of Reservation/ Designation as per Sanctioned DP, 2034 : | |
| | A. As per the DP plan<br>B. As per Govt. Notification | Reservation of Garden/ Park (ROS 1.5) + Zoo (ROS 2.3)<br>Designation of Garden (EOS 1.5) + Zoo (EOS 2.3) |
| 5 | Proposed modification | To include the said plot in Residential Zone by deleting the Reservation/ Designation as per the DP plan and Govt. Notification respectively dated 8th May 2018 respectively. |

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub section (1) of section 37 of the MR and TP Act, 1966 ; and of all other powers enabling it in this behalf, Brihanmumbai Municipal Corporation (hereinafter referred as BMC) hereby publishes a Notice for inviting objections/ suggestions from any persons with respect to proposed modification, as required by section 37(1) of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. BMC is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the proposed modification mentioned in the Schedule given below may be forwarded, in writing before the expiry of one month from the date of publication of this notification, to the office of

Chief Engineer (Development Plan)
Brihanmumbai Municipal Corporation,
5th floor, Municipal Head Office,
Mahapalika Marg, Fort, Mumbai 400 001.

Any objections or suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of section 37(1) of the said Act by the Chief Engineer (Development Plan) BMC.

A part plan showing the proposed modification is kept open for the inspection of the general public at the following offices :—

(1) Office of the Chief Engineer (Development Plan), 5th Floor, Brihanmumbai Municipal Corporation, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

*Schedule*

| Sr. No. | Details of land | Details of Reservation / Existing Amenity/Zone affected the said land shown in Column No 05 of Government Notification dated 8th May 2022. | Details of Reservation / Existing Amenity/Zone affected the said land as per Development Plan-2034 published u/s 31(1) of MR and TP Act, 1966. | Proposed Modification |
|---|---|---|---|---|
| 1 | C. S. No. 590 of Mazagaon Division. | Designation of Garden (EOS 1.5) + Zoo (EOS 2.3) and located in Residential Zone. | Reservation of Garden/ Park (ROS 1.5) + Zoo (ROS 2.3) and located Residential Zone. | Reservation/ Designation is deleted and included in Residential Zone. |

S. H. RATHOD,
Chief Engineer,
(Development Plan).

## बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक एसीडी/२९९५१/संअ(परि)प., दिनांक १२ जानेवारी २०२३

### जाहीर सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (आजतागायत सुधारित) च्या कलम २९७(१)(ब) अन्वये खालीलप्रमाणे जाहीर सूचना देण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'डी' विभागातील वाळकेश्वर रस्ता ते बाणगंगा टँक रस्ता येथील रस्ता प्रस्तावित ९.१५ मीटर (३० फूट) रुंदीकरणाबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सभेमध्ये मंजुरीकरिता सदर सूचना प्रस्तावित केल्यापासून ३० दिवसांच्या नंतर किंवा जेव्हा केव्हा सदरहू प्रस्ताव निकालात काढता येईल अशा महापालिकेच्या सभेत मांडण्यात येईल.

'डी' विभागातील ५.२० मी. (१७फूट) रुंदीच्या मंजूर रस्ता रेषेने बाधित असलेला वाळकेश्वर रस्ता ते बाणगंगा टँक रस्ता येथील रस्त्यास ९.१५ मी. (३० फूट) करण्याचे प्रस्तावित आहे. विकास नियंत्रण आणि प्रोत्साहक नियमावली, २०३४ नियम क्रमांक १९ (३) टीप (१) च्या अनुषंगाने आणि महानगरपालिका आयुक्त यांच्या क्र. प्र.अभि./ वि.नि./७३/साधारण/२०१९-२० च्या आदेशान्वये ९.०० मी. पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याचे स्थळाच्या सद्यःस्थितीनुसार एमआरटीपी किंवा एमएमसी कायद्यान्वये ९.०० मी. अथवा त्यापेक्षा अधिक रूंदीकरण करण्याचे निर्देशित केले आहे.

मा. महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी क्र. एमसीपी / २५७, दि. ३० सप्टेंबर २०२२ अन्वये तत्वतः मंजूर केलेली ९.१५ मी. (३० फूट) रस्ता रेषा नकाशावर दर्शविली आहे. ज्यामध्ये प्रचलित ५.२० मी. (१७ फूट) मंजूर रेषा लाल रंगात दर्शविली आहे आणि प्रस्तावित ९.१५ मी. (३० फूट) रस्ता रेषा हिरव्या रंगात दर्शविलेली असून सदर नकाशा सहायक आयुक्त 'डी' विभाग म्युनिसिपल कार्यालय, नाना चौक, ताडदेव, मुंबई  ४०० ००७ व सहायक अभियंता (सर्वेक्षण) शहर, उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव ) शहर, नवीन महापालिका इमारत, भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग, हनुमान मंदिरासमोर, अॅन्टॉप हिल, वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७ येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत निरिक्षणासाठी उपलब्ध ठेवण्यात आला आहे.

ज्या कोणास उपरोक्त प्रस्तावाबाबत प्रतिवेदने / हरकती पाठवावयाच्या असतील त्यांनी त्या उप प्रमुख अभियंता ( इ. प्र. ) शहर यांचे कार्यालय, नवीन महापालिका इमारत, भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग, हनुमान मंदिरासमोर, अॅन्टॉप हिल, वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७ किंवा सहायक आयुक्त 'डी' विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, जोबनपुत्रा कम्पाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७ यांच्या कार्यालयात संबंधित नोटिस प्रकाशनाच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत (सुट्टीचे दिवस धरून) प्राप्त होतील अशाप्रकारे पाठवाव्यात. त्यानंतर प्राप्त झालेली प्रतिवेदने / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

दिनांक १६ जानेवारी २०२३,
PRO/2594/ADV/2022-23.

**अविनाश गो. तांबेवाघ,**
उप प्रमुख अभियंता
(इमारत प्रस्ताव), शहर.

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

No. ACD 29951/AE(M)W, dated 12th January 2023

*PUBLIC NOTICE*

Notice is hereby given pursuant to section 297(*1*) (*b*) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (as mentioned up to date) that, the undersigned proposes to apply to the Municipal Corporation at their meeting to be held after 30 days from display of this public notices or such day thereafter, as the said application can conveniently be disposed off for authority to accept proposed 9.15 m. (30′0″) wide Regular line of the Road from Walkeshwar Road to Banganga Tank Road (Marked in A to B), Malabar Hill Division, D- Ward, Mumbai.

The road from Walkeshwar Road to Banganga Tank Road is having 5.20 m. (17′0″) wide Sanctioned Regular Line and same is proposed to be widened to 9.15 m. under section 297(*1*)(*b*) of MMC Act (as mentioned upto date), as per Note-l of Regulation 19(3) of DCPR, 2034 and as per subsequent order of Hon'ble Municipal Commissioner U/No. ChE/DP/73/Gen /2019-20 directing to widen the roads of width less than 9.00 m. to 9.00 m. and above as per site condition through MR and TP Act or MMC Act, 1888.

The proposed alignment of 9.15 m. wide R.L. is as shown on plan, which in principally approved by Hon. Municipal Commissioner *vide* approval under No. MCP/257, dated 30th September 2022. The prevailing alignment of sanctioned R.L. of 5.20 m. (17′00″) is shown in Red Colour and proposed alignment of 9.15 m. (30′00″) R.L. to be prescribed is shown in Green Colour on plan displayed at the office of Asstt. Commissioner ‘D’ ward, Nanachowk, Tardeo, Mumbai 400 007 and Asstt. Engineer (Survey) City, office of the Dy.Ch.E. (Building Proposal) City, Dosti Acres, Walmiki Chowk, Vidyalankar College Marg, Wadala (E.), Mumbai 400 037.

Any person desirous making any representation to the Corporation or of bringing before the Corporation any suggestion / objection in respect of the said proposal may do so by letter addressed Dy.Ch.E. (Building Proposal) City, Dosti Acres, Walmiki Chowk, Vidyalankar College Marg, Wadala (E.), Mumbai 400 037 or Asstt. Commissioner ‘D’ ward, Nanachowk, Tardeo, Mumbai 400 007 and deliver at the said office within one month from the publication of this notice. The letter received after such date, cannot be considered, which please be noted.

Dated 16th January 2023,
PRO/2594/ADV/2022-23.

AVINASH. G. TAMBEWAGH,
Dy. Chief Engineer
(Building Proposal), City.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक एसीडी/३५०७२/ स.अ.(परि) प, दिनांक १२ जानेवारी २०२३.

### जाहीर सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ ( आजतागायत सुधारित) च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये खालीलप्रमाणे जाहीर सूचना देण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'डी' विभागातील, पारसीवाडा १ली लेन व पारसीवाडा २ री लेन (व्ही. पी. रोड व नानुभाई देसाई रोड यांनी जोडलेला) येथील रस्ता प्रस्तावित ९.१५ मीटर ( ३० फूट) रुंदीकरणाबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सभेमध्ये सदर सूचना प्रस्तावित केल्यापासून ३० दिवसांच्या नंतर तसेच किंवा येणाऱ्या जेव्हा केव्हा सदरहू प्रस्ताव निकालात काढता येईल अशा महापालिकेच्या सभेत मांडण्यात येईल.

'डी' विभागातील ७.६२ मी. ( २५ फूट ) रुंदीच्या मंजूर रस्ता रेषेने बाधित असलेला पारसीवाडा १ली लेन व पारसीवाडा २ री लेन या रस्त्यास ९.१५ मी. (३० फूट) करण्याचे प्रस्तावित आहे. विकास नियत्रंण आणि प्रोत्साहक नियमावली, २०३४ नियम क्रमांक १९ (३) टीप (१) च्या अनुषंगाने आणि महानगरपालिका आयुक्त यांच्या क्र प. अभि. / विनि. / ७३ / साधारण / २०१९ - २० च्या आदेशान्वये ९.०० मी. पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याचे स्थळाच्या सद्यःस्थितीनुसार एमआरटीपी किंवा एमएमसी कायद्यान्वये ९.०० मी अथवा त्यापेक्षा अधिक रूंदीकरण करण्याचे निर्देशित केले आहे.

मा. महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी क्र. एमसीपी / २३११, दि. २९ डिसेंबर २०२२ अन्वये तत्वतः मंजूर केलेली ९.१५ मी (३० फूट) रस्ता रेषा नकाशावर दर्शवली आहे. ज्यामध्ये प्रचलित ७.६२ मी. (२५ फूट ) मंजूर रेषा लाल रंगात दर्शवली आहे आणि प्रस्तावित ९.१५ मी. (३० फूट) रस्ता रेषा हिरव्या रंगात दर्शविलेली असून सदर नकाशा सहायक आयुक्त 'डी' विभाग, म्युनिसिपल कार्यालय, नाना चौक ताडदेव, मुंबई ४०० ००७ व सहायक अभियंता (सर्वेक्षण) शहर, उप प्रमुख अभियंता ( इमारत प्रस्ताव ) शहर, नवीन महापालिका इमारत, भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग, हनुमान मंदिरासमोर, ॲन्टॉप हिल, वडाला (पूर्व), मुंबई ४०० ०३७ येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत निरिक्षणासाठी उपलब्ध ठेवण्यात आला आहे.

ज्या कोणास उपरोक्त प्रस्तावाबाबत प्रतिवेदने / हरकती पाठवायच्या असतील त्यांनी त्या सहायक आयुक्त 'डी' विभाग, म्युनिसिपल कार्यालय, नाना चौक, ताडदेव, मुंबई ४०० ००७ किंवा उप प्रमुख अभियंता ( इमारत प्रस्ताव ) शहर, नवीन महापालिका इमारत, भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग, हनुमान मंदिरासमोर, ॲन्टॉप हिल, वडाला (पूर्व), मुंबई ४०० ०३७ यांच्या कार्यालयात संबधित नोटिस प्रकाशनाच्या दिवसापासून १ महिन्याच्या आत प्राप्त होतील अशाप्रकारे पाठवाव्यात. त्यानंतर प्राप्त झालेली प्रतिवेदने / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

दिनांक १६ जानेवारी २०२३,
PRO/2595/ADV/2022-23.

**अविनाश गो. तांबेवाघ,**
उप प्रमुख अभियंता
(इमारत प्रस्ताव), शहर.

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

No. ACD 35072/AE (MJW Dated 12th January 2023.

### Public Notice

Notice is hereby given pursuant to section 297(1) (b) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (as mentioned upto date) that, the undersigned proposes to apply to the Municipal Corporation at their meeting to be held after 30 days from display of this public notices or such day thereafter, as the said application can conveniently be disposed off for authority to accept proposed 9.15 m. (30'0") wide Regular line of the Roads known as Parsiwada 1st Lane and Parsiwada 2nd Lane, connecting to V.P. Road and Nanubhai Desai Road (Marked in A to D), Girgaum Division, D- Ward, Mumbai.

The Parsiwada 1st and 2nd Lane is having 7.62 m. (25'0") wide Sanctioned Regular Line and same is proposed to be widened to 9.15 m. under section 297(*1*)(*b*) of MMC Act (as mentioned upto date), as per Note-l of Regulation 19(3) of DCPR, 2034 and as per subsequent order of Hon'ble Municipal Commissioner U/No.ChE/DP/73/Gen /2019-20 directing to widen the roads of width less than 9.00m. to 9.00m. and above as per site condition through MR and TP Act or MMC Act, 1888.

The proposed alignment of 9.15 m. wide R.L. is as shown on plan, which in principally approved by Hon. Municipal Commissioner *vide* approval under No. MCP/2311, dated 29th December 2022. The prevailing alignment of sanctioned R.L. of 7.62 m. ( 25'-00") is shown in Red Colour and proposed alignment of 9.15 m. (30'00") R.L. to be prescribed is shown in Green Colour on plan displayed at the office of Asstt. Commissioner 'D' ward, Nanachowk, Tardeo, Mumbai 400 007 and Asstt. Engineer (Survey) City, office of the Dy.Ch.E. (Building Proposal) City, Dosti Acres, Walmiki Chowk, Vidyalankar College Marg, Wadala (E.) Mumbai 400 037.

Any person desirous making any representation to the Corporation or of bringing before the Corporation any suggestion / objection in respect of the said proposal may do so by letter addressed Dy.Ch.E. (Building Proposal) City, Dosti Acres, Walmiki Chowk, Vidyalankar College Marg, Wadala (E.) Mumbai 400 037 or Asstt. Commissioner 'D' ward, Nanachowk, Tardeo, Mumbai 400 007 and deliver at the said office within one month from the publication of this notice. The letter received after such date, cannot be considered, which please be noted.

Dated 16th January 2023,
PRO/2595/ADV/2022-23.

AVINASH G. TAMBEWAGH,
Dy. Chief Engineer
(Building Proposal), City.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.